ISSN: 2249-894X IMPACT FACTOR : 5.2331(UIF) VOLUME - 6 | ISSUE - 11 | AUGUST - 2017

REVIEW OF RESEARCH

# औद्योगिक विकास मंडळाच्या सहभागने नागपूर जिल्हयातील बेरोजगारांच्या व्यवसायिक कौश्यल्यातील वाढ: एक अध्ययन




डॉ. लक्ष्मण एन. गायकवाड
विमेन्स् कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, नागपुर.

**सारांश –**

प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश नागपूर येथील बुटीबोरी व हिंगणा क्षेत्रातील कार्यरत महाराष्ट्र औद्योगिक विकासमंडळ यांच्याद्वारे राबविण्यात येणा-या विविध योजनांचा व उद्योजकांच्या विकासात असणा-या योगदानाचा परामर्श घेणे हा आहे. औद्योगिक क्षेत्राला लागणारे सर्व श्रमिक नागपूर बाजारपेठ व अन्य श्रम बाजरपेठेतून पुरवठा केला जातो. याशिवाय उद्योगांना लागणारा कच्चा माल देशातून व विदेशातून आयात करण्यात येतो. तसेच विदेशात निर्यात करणाऱ्या उद्योगाची संख्या २० टक्के एवढी आले. याचा प्रत्यक्ष फायदा देशाच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी व आर्थिक विकासाचा दर वाढविण्यासाठी होतो. याचाच अर्थ हा की, बुटीबोरी व हिंगणा क्षेत्रातील औद्योगिक क्षेत्राच्या परिसरात महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाचे स्थान निश्चित मोलाचे आहे

## प्रस्तावना

वर्तमान युग हे औद्योगिक क्रांतीचे युग आहे. उत्पादन, प्रथम मनुश्य शक्तीच्या आधारे केले जाई, पण औद्योगिक क्रांतीमुळे, उत्पादन क्षेत्रात यंत्राचा षिरकाव होऊन,यंत्राच्या साहाय्याने उत्पादन करण्यात येऊ लागले. औद्योगिक क्रांतीपूर्वी, कामगार हा स्वत:च्या हस्तकौशल्याचा स्वामी होता. माल, उत्पादन, उत्पादित मालावरचे कौशल्य, तसेच त्या मालाची विक्री याबाबतचे, सर्व निर्णय तो स्वत:च घेत असे. औद्योगिक युगात, उत्पादन यंत्राच्या सहाय्याने होत असल्यामुळे, उत्पादनाचा दर्जा उंचावून, मालाचे उत्पादन मुल्य कमी झाले. त्यामुळे, कमी किंमतीतील माल, मोठया संख्येने बाजारात उपलब्ध झाला. परिणामत: मनुष्याने स्वत:च्या हस्तकौशल्याने निर्माण केलेले 'कुशल कारागीरा'चे स्थान डळमळले. व त्याला मजुराच्या भूमिकेत जावे लागले. ग्रामीण भागातील कारागीरांना, बहुसंख्येने शहराकडे स्थलांतरित व्हावे लागले. ग्रामीण कारागीर म्हणून आलेले हे कामगार, कारखान्यात मजुर म्हणून काम करू लागले. जो कामगार उत्पादक होता, तो यंत्रचालक बनला.


आजच्या उद्योगधंद्याचे मानवाच्या जीवनावर दुरवर परिणाम झालेले आहेत. उद्योगधंद्यांचा समाजाशी निकटचा संबंध येतो. आधुनिक युगातल्या उत्पादन प्रक्रियेत, मनुष्यबळापेक्षा यंत्रशक्तीवर अधिक भर दिला जातो.

### औद्योगिक विकास मंडळाच्या सहभागने वेळोवेळी विविध उद्योगांवरील प्रशिक्षण कार्यक्रमामुळे उद्योजकांचा व्यवसायिक कौश्यल्यात वाढ झाली आहे.

सारणी क्रमांक १

औद्योगिक विकास मंडळाच्या सहभागने व्यवसायिक कौश्यल्यातील वाढ दर्शविणारी सारणी

| अ.क्र. | कौश्यल्यातील वाढ | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुर्णता सहमत | ४५ | २२.५टक्के |
| २ | सहमत | ७० | ३५ टक्के |
| ३ | अनिश्चित | ४६ | २३ टक्के |
| ४ | असहमत | २८ | १४ टक्के |
| ५ | पुर्णता असहमत | ११ | ५.५ टक्के |
| | **एकुण** | २०० | १००.०० |




उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण २०० उद्योजकांपैकी ७० उद्योजक हे वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ३५ इतकी आहे. ४५ उद्योजक हे वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २२.५ इतकी आहे. ४२ उद्योजक हे वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी २३ इतकी आहे. परंतु २८ उद्योजक हे वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी १४ इतकी आहे.

सारणी क्रमांक ब

औद्योगिक विकास मंडळाच्या सहभागने व्यवसायिक कौश्यल्यात वाढ झाली या विधान बाबत उत्तरदात्यांद्वारे प्रदान करण्यात आलेले सरासरी गुण

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| **200** | **3.6** | **±1.01** | **0.21** | **1** | **5** |

N :- **संख्या**; Mean :- **मध्यमान**, SD :- **मानक विचलन**; SE :- **मानक तृटी**; Min :- **किमान**; Max :- **कमाल**


वरील सारणी प्रमाणे उद्योगजकांच्या व्यावसायीक कौशल्यात वाढ झाली या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.६ ± १.०१ गुण प्रदान करण्यात आले. म्हणजेच बहुतांश उत्तरदाते या विधानाबाबत अनिश्चित नाहीत याचाच अर्थ असा बहुतांश उत्तरदाते वरील विधानात सहमत आहेत. सारणी क्रमांक अ व ब या सारणीतील माहिती वरून औद्योगिक विकास मंडळाच्या सहभागने वेळोवेळी विविध उद्योगांवरील प्रशिक्षण कार्यक्रमामुळे उद्योजकांच्या व्यावसायीक कौशल्यात वाढ झाली आहे.

**औद्योगिक विकास मंडळाच्या सहभागने बेरोजगार लोकांना त्यांचा उद्योग/ व्यवसाय सुरू करणे सुलभ झाले आहे.**

**सारणी क्र. क.**

**उद्योग/ व्यवसाय विषयक मत दर्शविणारी सारणी**

| अ.क्र. | उद्योग/ व्यवसाय | संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पुर्णता सहमत | ०५ | २६टक्के |
| २ | सहमत | ७४ | ३७ टक्के |
| ३ | अनिश्चित | ४० | २० टक्के |
| ४ | असहमत | १६ | ०८ टक्के |
| ५ | पुर्णता असहमत | १८ | ९ टक्के |
| | एकुण | २०० | १००.०० |




उपरोक्त सारणीवरुन असे निदर्शनास येते की, एकुण २०० उद्योजकांपैकी ७४ उद्योजक हे वरील मंताशी सहमत आहे व त्यांची टक्केवारी ३७ इतकी आहे. ५२ उद्योजक हे वरील मंताशी पुर्णता सहमत आहे व त्यांची टक्केवारी २६ इतकी आहे. ४० उद्योजक हे वरील मंताशी अनिश्चित आहे व त्यांची टक्केवारी २० इतकी आहे. परंतु १६ उद्योजक हे वरील मंताशी असहमत आहे व त्यांची टक्केवारी ८ इतकी आहे.

**सारणी क्र. ड.**

**औद्योगिक विकास मंडळाच्या सहभागने बेरोजगार लोकांना त्यांचा उद्योग/ व्यवसाय सुरू करणे सुलभ झाले या विधानाला उत्तरदात्यांद्वारे प्रदान करण्यात आलेले सरासरी गुण**

| N | Mean | SD | SE | Min | Max |
|---|---|---|---|---|---|
| 200 | 3.6 | ±0.96 | 0.23 | 1 | 5 |

N :- **संख्या**; Mean :- **मध्यमान,** SD :- **मानक विचलन**; SE :- **मानक तृटी**; Min :- **किमान**; Max :- **कमाल**

वरील सारणी प्रमाणे बेरोजगार त्यांचा उद्योग / व्यवसाय सुरू करणे सुलभ झाले या विधानाला उत्तरदात्यांद्वारे सरासरी ३.६±०.९६ गुण प्रदान करण्यात आले. याचाच अर्थ असा की, बहुतांश उत्तरदाते या विधानासंबंधी अनिश्चित नाहीत म्हणजेच ते वरील विधानाशी सहमत आहेत. सारणी क्रमांक क व ड या सारणीतील माहिती वरून जिल्हा उद्योग केंद्रामुळे बेराजगार लोकांना त्यांचा उद्योग / व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज मिळणे सुलभ झाले.

## निष्कर्ष

नागपूर विभागातील प्रमुख जिल्हा निहाय औद्योगीक परिक्षेत्राची स्थिती बघता बुटीबोरी व हिंगणा औद्यौगिक क्षेत्रा जास्त विकसित झाले आहे. खेडयाच्या तुलनेत नागपुर शहरात रोजगारांच्या अधिक संधी महाराष्ट्र औद्योगिक विकासमंडळाने निर्माण केल्या मुळे बेरोजगार

उद्योगकडे आकर्षित झाले आहेत. त्यामुळे बेरोजगार लोकांना त्यांचा उद्योग/व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्ज मिळणे सुलभ झाले आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकासमंडळाद्वारे वेळोवेळी विविध उद्योगांवरील प्रशिक्षण कार्यक्रमामुळे उद्योजकांचा व्यवसायिक कौश्यल्यात वाढ झाली आहे. इतर जिल्हातील लघु उद्योग घटकांची तुलना केली असता नागपूर जिल्ह्यातील बुटीबोरी व हिंगणा औद्यौगिक क्षेत्रात सर्वात जास्त उद्योग सुरू आहे. तेच स्थिती मोठा उद्योगाचा बाबतीत निदर्शनात येते.

## संदर्भ सूची


- डॉ. प्रदिप आगलावे – संशोधन पद्धती व शास्त्र व तंत्रे, प्रमोद मुंजे, विद्या प्रकाशन नागपूर.
- डॉ. सुधीर बोधनकर – सामाजीक संशोधन पद्धती, साईनाथ प्रकाशन २०१३
- डॉ. प्रभाकर देशमुख – उद्योजकता विकास, संकल्पना आणि व्यवहार, पिंपळापुरे अँड क. पब्लीशर्स, नागपूर.
- डॉ. पी.के. कुलकर्णी – उद्योगाचे समाजशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर.
- महाराष्ट्र शासन–लोकराज्य २००९.
- जैन भवरलाल–आसुरलेली कोरडवाहू शेती, लोकमत ४/०२/०९
- ताकवले राम– सकाळ(सप्तरंग) शिक्षणातील प्रगती– प्रश्न व दिशा, २२/११/२००९.
- मगर शंकरराव, शिर्के विठ्ठलराव–जलसंपत्ती, समस्या आणि नियोजन, सकाळ (सप्तरंग) ६/१२/२००९
- महाराष्ट्र द इकॉनॉमिक पॉवर हाऊस – फ्रंटलाईन–२००३, (खंड २०)
- बुरंगे एल, जी– इंडस्ट्रिल ग्रोथ ॲन्ड स्ट्रक्चर, ईपीडब्ल्यू, २७ फेब्रुवारी १९९९.
- उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन, उद्योग साधना, महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालक, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९९५
- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ३४ वा वार्षिक अहवाल,१९९५–९६.
- Govt. of India study of Industrial Estates, New Delhi, 1996
- Rural Enterprise and Non Farm Employment, A world Bank Paper, Jan. 1978.
- United National, Industrial Estates – Policies Plans and Progress, new York 1996
- उद्योग संचालना मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेवर संक्षिप्त टिपणी, हिवाळी अधिवेशन २०००, नागपूर.